महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट/252/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 22/07/2024

# 1)घरफोडी :–

**मुखेड :–** दिनांक 20.07.2024 रोजी 22.00 वा.ते दिनांक 21.07.2024 रोजी 05.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी होळकर नगर ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने फिर्यादरचे घराचे व इतराच्या घराचे कडी कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील सोन्या चांदीचे दागीने व नगदी असा एकुण किंमती 61,600/–रूपयाचा मुद्देमाल चोरून नेले. वगैरे **फिर्यादी संग्राम नारायण हाके, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. होळकर नगर ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 266/2024 कलम 305, 331,(4) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2352, गोंटे मो. नं. 9822618672** हे करीत आहेत.

# 2)जबरी चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 21.07.2024 रोजी 12.20 वा. चे सुमारास, **रामदेव ज्वेलर्स, सोनवने मेडिकल जवळ श्रीनगर नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने मोटार सायकलवर येवुन फिर्यादीचे खांदयावरील हॅन्डबॅग पर्स त्यामध्ये दोन सॅमसग व लावा कंपनीचे मोबाईल फोन किंमती 11,000/–रू व नगदी 500/–रू असा एकुण किंमती 11,500/–रूपयाचा मुद्देमाल जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी आयशा बेगम सलीम शेख, वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. श्रीनगर,नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 354/2024 कलम 309, (4) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री केजगिर, मो. नं. 8830763211** हे करीत आहेत.

# 3)मो.सा.चोरी :–

**भोकर :–** दिनांक 19.07.2024 रोजी 10.00 वा.ते दिनांक 20.07.2024 रोजी 07.00 वा.चे दरम्यान, **महावीर नगर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांची हिरो कंपणीची स्पेल्डर प्लस मोटार सायकल क्रं. एमएच. –26/सीजे–8784 किंमती 60,000 /–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी आशिष संजय आडे, वय 21 वर्षे, रा.महावीर नगर भोकर ता. भोकर जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 250/2024 कलम 303 (2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2401 जाधव, मो.नं. 9850493110** हे करीत आहेत.

# 4)चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 20.07.2024 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **बाबादिपसिंग गुरूव्दारा कौठा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून यातील फिर्यादी यांचे ट्रक क्रं. एमएच.–26/सीएच–7117 हा गुरूव्दारा समोर उभा केला असता ट्रकचे 10 टायर व 05 डिक्स एकुण किंमती 1,60,000 /– रूपयाचे गाडीचे सामान चोरून नेले. वगैरे **फिर्यादी गुरूनाथ उत्तम चव्हान, वय 34 वर्षे, व्यवसाय चालक रा. राहुल नगर वाघाळा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 645/2024 कलम 303 (2),3 (5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/कोरे, मो.नं. 8888836607** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 18.07.2024 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **श्रावस्तीनगर रोडवर नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांची आई मोटार सायकलवर बसुन घराकडे जात असताना यातील दोन अज्ञात पुरूष व दोन महिला आरोपीतांनी संगनमत करून आमचे घराच्या छताचे काम का थांबवा म्हणतो असे म्हणुन शिवीगाळ व लाथाबुक्यानी मारहाण करत असताना फिर्यादीचा मोठा भाऊ भांडण सोडवण्यासाठी आला असता दोन अज्ञात आरोपीतांनी त्यांच्या डोक्यात फावडे मारून डोके फोडुन गंभीर दुखापत केली. व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.वगैरे **फिर्यादी** संदिप राजु सावळे, **वय 27 वर्षे, व्यवसाय मजुरी रा.श्रावस्तीनगर,.नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 277/2024 कलम 118(2),115 (2),352, 3 (5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/तुरनर, मो. नं. 9922088409** हे करीत आहेत.

## 6)प्राण्यांस क्रुरतेने वागणुक :–

**1)धर्माबादः–** दिनांक 20.07.2024 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **मंगनाळी पाठीजवळ ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या गोवंश जातीचे पाच जनावरे किंमती 1,40,000/–रूपयाचे आखुड दोरीने बांधुन त्यांना ईजा यातना होईल अशा रीतीने वागणुक देवुन कतल करण्याच्या उदेशाने बैलाना पायी घेवुन जात असताना नमुद ठिकाणी त्यातील एक जखमी बैल तेथे सोडुन बाकीचे बैल घेवुन गेला. वगैरे **फिर्यादी पोना/2563, संतोष संभाजी आनेराव,ने.पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 214/2024 कलम 11(1),(क),5(अ), (2) 9 प्राण्यांस निर्दयतेने वागण्यास महाराष्ट्र प्राणी संरक्षण व प्राण्यांना क्रुरतेने वागणुक अधिनियम 1960 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2359, श्री सुंर्यवंशी,** मो.क्रं. हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–** दिनांक 21.07.2024 रोजी 06.30 वा. चे सुमारास, **अर्धापुर ते नांदेड येणारे रोडवर शंकरराव चव्हान चौकात,नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या गोवंश जातीचे चार जनावरे किंमती 90,000/ –रू चे एक महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक एमएच–29/बीई–4279 किंमती 6,00,000/–रू चे मुद्येमालासह वाहतुक करीत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2191, किशन कोंडीबा चिंतोरे,ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 267/2024 कलम कलम 5, (अ),9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण व प्राण्यांना क्रुरतेने वागणुक अधिनियम 1960 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**1986 श्री कानगुले,** मो.क्रं. 96577707486 हे करीत आहेत.

## 7)विवाहीतेचा छळ :–

**किनवट :–** दिनांक 01.06.2019 ते आज पावेतो दरम्यान, **बस आगार जावळी (मेंढा) ता.जावळी जि.सातारा ह.मु. गोंकुदा ता.किनवट जि.नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीताने फिर्यादी बाईस प्लॉट घेण्याकरीता म्हणुन तुझे माहेरहुन पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस सतत शिवीगाळ व मारहाण करून, शारीरीक माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 30 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 210/2024 कलम 85, 115(2), 351(3),352 भारतीय न्याय संहीता– 2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/1913 राठोड, मो.क्रं. 9552288455** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**1)देगलुर :–**दिनांक 21.07.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **मौ.कावळगाव सार्वजनिक रोडवर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 14,120/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2613,साहेबराव जमनाजी सगरोळीकर, ने.पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 345/2024 कलम 12(अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पाहेकॉ/2437, इंगोले मो.नं. 9423440472** हे करीत आहेत.

**2)हदगाव :–**दिनांक 22.07.2024 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **मौ.तळणी गोदामच्या पाठीमागे पत्राच्या शेडमध्ये ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या पत्यावर पैसे लावुन तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2,520/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/सुरेश एकनाथ मान्टे, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 207/2024 कलम 12(अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/900, सातपुते मो.नं. 9823216771** हे करीत आहेत.

## 10)प्रोव्हिबीशन :–

**1)मुक्रामाबाद :–** दिनांक 21.07.2024 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **मौ. दापका ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद महिला आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 3500/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/346, गजानन मारोती ढगे ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 154/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2068, श्री कागणे, मो.नं. 8459537419** हे करीत आहेत.

**2)मुक्रामाबाद :–** दिनांक 21.07.2024 रोजी 13.48 वा. चे सुमारास, **चमन मध्ये मोकळया जागेत मुक्रामाबाद ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 3200/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2396, गंगाधर महिपती नरबाग ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 152/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1996, श्री आडेकर, मो.नं. 8668750448** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड